## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४१७ /पुणे | श्री.कोंडिबा बाळा अडसूळ मु.पो.सादलगांव, ता.शिरूर, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,केडगाव ता.दौंड, जि.पुणे | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,केडगाव ता.दौंड, जि.पुणे | विद्युत ग्राहक क्र.१८४२९२०३६२ ५० एकूण तीन मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्यास दोन दिवसात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १२३८ / पुणे | श्री. नितीन बेल्हेकर रा.३२२, एज.जी. रोड, फ्लॅट नं.४, पहिला मजला, बुधानी वेफर्स जवळ , बॉम्बे स्वदेशी स्टोअर्सच्या मागे, कॅम्प, पुणे-१ | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (१), अधीन जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, शिवाजीनगर, पुणे-५ | जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, साखर संकूल, शिवाजीनगर, पुणे-५ | एका नावाच्या दोन सहकारी संस्थांची नोंदणी आपल्या कार्यालयात होऊ शकते का ? | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत मागणी बसत नसल्याचे जन माहिती अधि-काऱ्यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलावर माहिती दिली आहे. |
| ३ | ६१७ / पुणे | श्री. शंकर दशरथ गायकवाड मु.वांजळे, पो. दापोडे, ता.वेल्हा, जि. पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हा, ता. वेल्हा, जि.पुणे | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे | सन २००५-२००६ या कालावधीतील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत मौजे वांजळे येथील मृद व जल या कामा करिता अन्नधान्य वाटपाबाबत | आवश्यक ती माहित प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि. ४.९.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २७०४ /पुणे | श्री.श्रीपत मारूती थोरात ३४९/५, कलापूर्ण निवास, लक्ष्मी सॉ मिल समोर, लोणावळा, ता.मावळ जि. पुणे | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड, पुणे | प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड, पुणे | ट्रॅक्स वाहन क्र.एमएच-१२ बी ५३७९ या गाडी संबंधातील माहिती व रिक्षा क्र.एमएच-१४ एल-९६७७ या परमिट नूतनी - करणाबाबत माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि. १२.३.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| ५ | १६०८/ पुणे | श्री. श्रीकांत विठ्ठल वाळुंज सर्व्हे नं.९०, आदर्श इंदिरानगर आरटीओ जवळ, येरवडा, पुणे-६ | प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | डेक्कन कॉलेजने दिलेल्या ग्रंथालय परिचर या पदाच्या सुधारित वेतनश्रेणी बाबत व आपल्या अधिपत्याखाली किती अभिमत विद्यापीठे येतात या बाबतची माहिती | आवश्यक ती माहिती १० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ५ अपिले (क्र. १४१७, १२३८, ६१७, २७०४, १६०८) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. २०.३.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२६/ पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.दशरथ नाना राऊत<br>मु.पो.खांडज, ता.बारामती, जि.पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सचिव,<br>शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु.,<br>ता.बारामती, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | चेअरमन,<br>शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु.,<br>ता.बारामती, जि.पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री.दशरथ नानासाहेब राऊत यांनी दि.०२.१०.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, मालेगाव बु. यांच्याकडे संस्थेचे अद्यावत घटना नियम व नियमावलीची प्रत मागितलेली होती.

सदर अपिलाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०१.२००९ रोजीचे निवेदन सादर केले असून, असे अवगत केले आहे की, अपीलकर्त्यास त्याचे मागणीप्रमाणे मागितलेली माहिती दि.११.११.२००८ रोजी दिली आहे. माहिती मिळालेबाबत अपीलकर्त्याची स्वाक्षरीसह पोहच सादर केली आहे. तसेच श्री.राऊत यांनी याच संस्थेविरुध्द अपील क्र. १४२७, १४२८ दाखल केली होती. त्याचाही दि.२३.१२.२००८ रोजी निर्णय देवून अपीले निकाली काढणेत आली आहेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. : ३१-०३-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भास्करराव नामदेवराव घोलप
मु.पो.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे -११ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
(१)उपविभागीय अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.३,
मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे
(२)कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१,
नारायणगाव वसाहत, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५९ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे -११ प्रतिनिधी श्री.डी.के.बक्षी

**जन माहिती अधिकारी** तथा )उपविभागीय अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.३,
मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.डी.के.पोखरकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.९.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००६ ते २००७ मधील घोडनदी व बुब्रा नदी या पश्चिम आदिवासी भागामधील बुडीत क्षेत्रामधील वाडी / वस्तीसाठी बांधण्यात येत असलेल्या बंधारे कामांसाठी नदी पात्रांमधील गौण-खनिज, दगडखाण व क्रशर, खडी आणि वाळू उपसा उत्खनन नियमबाह्य असले/नसले बाबत पाच मुद्दयावरील माहिती. | |

## विवेचन

घोड नदी व बुब्रा नदीवरील गौण खनिज उत्खनन, पश्चिम आदिवासी भागामधील बुडीत क्षेत्रामधील वाडी / वस्तीसाठी बांधण्यात येत असलेल्या बंधारे कामे याची माहिती देण्यासाठी अवाजवी रक्कम भरण्यास सांगितल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.भास्करराव नामदेव घोलप यांनी केलेल्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांनी निर्णय दिला नाही व माहिती मिळाली नाही, या कारणावरुन श्री.घोलप यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी सुनावणीची सूचना आपल्याला तारखेनंतर मिळाल्यामुळे पुढील तारीख देण्याची विनंती श्री.घोलप यांनी दि.६.११.२००८ च्या पत्रान्वये केली. अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

संबंधित बंधा-याच्या कामासाठी नदीपात्रामधील गौण खनिज, वाळू यांचा उपसा व दगड खाण, खडी काम इ. बेकायदेशीर झालेले असल्याचा आरोप श्री.घोलप यांनी आयोगाला सादर केलेल्या विविध कागदपत्रांमध्ये केलेला आहे. या संदर्भातील माहिती देण्यासाठी रु.५००००/- शुल्क भरण्यास जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग

क्र.३, मंचर, ता.आंबेगाव यांनी श्री.घोलप यांना कळविले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे आकारणी न करता ८ निवाड्याच्या कागदपत्रास रु.४०,०००/- व प्लान एस्टीमेटच्या कागदपत्रांचे रु.१००००/- अशी रक्कम भरण्यास आपल्याला सांगण्यात आले. आठ बंधाऱ्यांवर सुमोर ११कोटी ४६लाख रुपये खर्च सन २००७ मध्ये केला आहे. कामाचा निकृष्ट दर्जा व त्यातील भ्रष्टाचार उघड होऊन नये, म्हणून असे भरमसाट शुल्क कळवून माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असे आपल्याला वाटते, असे श्री.घोलप यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांनी सुनावणीच्या तीन तारखा दिल्या, आपण हजर राहिलो, परंतु तीनही वेळेला जन माहिती अधिकारी हजर नव्हते. चौथ्या वेळेला चर्चा झाली, असेही श्री.घोलप यांनी निवेदनात नमूद केले आहे. मात्र सुनावणीच्या प्रत्येक तारखेच्या वेळी श्री.घोलप यांनी तारीख बदलून मिळण्याची मागणी केली, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे श्री.भा.चं.कुंजीर यांनी आयोगाला दि.२०.१०.२००८ व दि.९.३.२००९ राजी सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. तशा स्वरुपाच्या श्री.घोलप यांच्या पत्राच्या प्रतीही त्यांनी सादर केल्या आहेत. चौथ्या तारखेला श्री.घोलप उपस्थित होते व त्यावेळी त्यांनी माहितीची आवश्यकता नसल्याचे सांगितले, मात्र अपिलाचा निर्णय कळविण्याचे तत्कालीन प्रथम लिपीक श्रीमती जोशी यांच्या नजरचुकीने राहून गेले, असेही त्यांनी या निवेदनात नमूद केले आहे.

संबंधित कामाच्या निविदा व अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव यांच्या कार्यालयात उपलब्ध असून शुल्क भरल्यास ही माहिती त्वरित पुरविण्यात येईल, असे श्री.कुंजीर यांनी निवेदनात म्हटले असून आयोगापुढील सुनावणीत त्यांचे प्रतिनिधी श्री.दि.का.बक्षी व जन माहिती अधिकारी श्री.डी.के.पोखरकर यांनी त्याचा पुनरुच्चार केला. 'बंधाऱ्याच्या निविदांच्या पुस्तिका आपल्या अर्जाप्रमाणे माहितीसाठी आपल्याला घ्याव्या लागणार आहेत, त्यामुळे प्रत्येक निविदा किंमत रक्कम रु.५००० प्रमाणे आठ बंधाऱ्यांसाठी

रु.४०,०००/- व प्लान एस्टीमेटच्या छायांकित प्रतीसाठी रु.१०,०००/- असे ५०,०००/- रुपये शुल्क भरावे,' असे उपकार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग, क्र.१, नारायणगाव, ता.जुन्नर यांनी श्री.घोलप यांना दि.९.५.२००७ रोजी कळविले. त्याचा तपशील पत्रासोबत दिला असून त्यात शासनाने विहित केलेले शुल्क व कागदपत्रांच्या प्रती पृष्ठ रु.२ प्रमाणे अशी रक्कम नमूद केली आहे, ते रास्त आहे. मात्र माहिती भरण्याचा व इतर मेहनताना म्हणून रु.३५००/- दाखविले आहेत, ते पूर्णत: चुकीचे आहे. अशा प्रकारे मेहनताना आकारता येणार नाही. याची नोंद घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे श्री.भा.चं.कुंजीर यांनी आपल्या अधिनस्त कार्यालयांना तशा सूचना देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शांतीलाल सोमा तांबे
मु.पो.सणसवाडी, ता.शिरुर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
१.अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे — उत्तरवादी
२.वाचक पोलीस उपअधीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, परिक्षेत्र कोल्हापूर, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
१.उपविभागीय पोलीस अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे
२. कार्यालय अधीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, परिक्षेत्र कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२०+१५४४ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा १.अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे प्रतिनिधी श्री.रविंद्रसिंह परदेशी
२.वाचक पोलीस उपअधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, परिक्षेत्र कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.भारत तांगडे

**जन माहिती अधिकारी** तथा
१.उपविभागीय पोलीस अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे श्री.रविंद्रसिंह परदेशी
२. कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, परिक्षेत्र कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.हंबीरराव महाडीक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.९.२००७, २४.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>**अपील क्र.१५२०**<br><br>एफआयआर वर आपलया कार्यालयाने कोणती कार्यवाही/कारवाई केली. चार्जशीट न्यायालयात किती दिवसात दाखल करतात/ यासंबंधी शासनाच्या आदेशाची / परिपत्रकाची प्रत.<br><br>**अपील क्र.१५४४**<br><br>सोबत जोडलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही/कारवाई केली. नसेल तर का आणि कशी, तपशील, या अर्जानंतर आपल्या कायार्लयाने पोलीस अधीक्षक / शिक्रापूर पोलीस स्टेशनला काय आदेश दिला, प्रत, याप्रमाणे दोन्ही कार्यालयाने केलेल्या कारवाईची प्रत. | |

## विवेचन

आपण केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालय, ग्रामीण पुणे व विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे दोन स्वतत्र अर्जाद्वारे अपीलकर्ता श्री.शांतीलाल सोमा तांबे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर माहिती अपुरी मिळाल्याच्या कारणावरुन श्री.तांबे यांनी दोन अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत.

दि.२१.१०.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले. मात्र दरम्यानच्या काळात आपल्याला संपूर्ण माहिती मिळाली असून आपली तक्रार

राहिलेली नाही, असे लेखी निवेदन श्री.तांबें यांनी आयोगाला सादर केले आहे. अपीलकर्ता यांची तक्रार राहिली नसल्याने दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शहाजी रामदास भगत
कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.
सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.
सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५३+१५५४ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शहाजी रामदास भगत
कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.
सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे प्र.श्री.सचिन रावल

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.
सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे श्री.एस.आर.भगत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. -- |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>**प्रथम अपिलावर जन माहिती अधिकारी यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.** | |

## विवेचन

माहिती मागणारे अर्जदार श्री.सोमनाथ मारुती करे यांच्या दारिद्र्यरेषेखालील दाखल्याबाबत घेतलेला आक्षेप विचारात न घेता १५ दिवसांच्या आत नि:शुल्क माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे श्री.डी.आर.घोडे यांनी दिला, या निर्णयाविरुध्द श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक श्री.शं.रा.भगत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.करे यांनी मागितलेली माहिती विस्तृत होती. तसेच त्यांनी अर्जासोबत जोडलेला दारिद्र्यरेषेखालील दाखला सक्षम अधिकाऱ्यांचा व योग्य स्वरुपातील नव्हता. त्यांनी दारिद्र्येरेषेखालील पुरावा म्हणून अर्जासोबत जोडलेल्या शिधापत्रिकेवरील सही व अर्जावरील सही यामध्ये बरीच तफावत आहे. हे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले. त्याबाबत त्यांनी कोणतीही दुरुस्ती केली नाही. त्यांना माहिती नाकारलेली नव्हती, तर ती विस्तृत असल्यामुळे संकलित करण्याचे काम चालू असून विलंब लागेल, असे कळविले होते, असे अपीलकर्ता श्री.शहाजी रामदास भगत यांनी नमूद केले. असे असूनही व अपिलाच्या सुनावणीला श्री.करे उपस्थित नसताना अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे यांनी त्यांची दोन्ही अपिले मान्य केली व दारिद्र्यरेषेखालील पुरावा ग्राह्य धरुन माहिती नि:शुल्क देण्याचा आदेश दिला. श्री.करे कोणत्याही सुनावणीला हजर राहिले नाहीत व रहात नाहीत. त्यांच्या वतीने अन्य व्यक्ती हजर असतात. सह्यांमधील तफावतीबाबतही त्यांनी खुलासा केलेला नाही, असेही श्री.भगत

यांनी नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे श्री.सचिन रावल यांनी तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय रास्त असल्याचे प्रतिपादन केले.

श्री.भगत यांनी सादर केलेली कागदपत्रे व त्यांचे निवेदन याचा विचार करता माहितीची मागणी करणारे श्री.सोमनाथ मारुती करे यांनी दारिद्र्यरेषेखालील दाखला व सह्यामधील तफावत याबाबत निःसंदिग्ध खुलासा केलेला नाही. दारिद्र्यरेषेखालील सवलतींचा फायदा रास्त व्यक्तींनाच मिळाला पाहिजे व त्यासाठी कायदेशीररीत्या योग्य असे पुरावे सादर झालेच पाहिजेत. तसेच सह्यांमध्ये तफावत असेल तर त्याबाबतची शहानिशाही झाली पाहिजे. या बाबी अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे श्री.डी.आर.घोडे यांनी प्रथम अपिलाचा निर्णय देताना विचारात घेतलेल्या नाहीत, त्यामुळे त्यांच्या निर्णयास मान्यता देता येणार नाही.

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे श्री.डी.आर.घोडे यांचा दि.१७.१२.२००७ चा निर्णय रद्द करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

खालील नमूद केलेल्या अपिपलाचा दि.२८.०८.२००८ व दि.२५.११.२००८ च्या अनुकमे 'सुनावणी' व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५६७ | श्री. अर्जुन नामदेव ठोंबरे ५८७, बुधवार पेठ, पुणे | सहायक अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे | नगर उप अभियंता, महानगरपालिका, पुणे | मौजे कोथरुड येथील सर्व्हे नं.७९ चा भाग दाखला मिळणेबाबत |
| २ | १६२४ | श्री.विजय विठ्ठलराव देवगावकर बिल्डिंग एन, फ्लॅट नं.२, चैतन्यनगरी, वारजे, पुणे | नगर उप अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे | विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे | मौजे महर्षि कर्वेनगर, ता.हवेली येथील सर्व्हे नं.१५ चा भाग नकाशा मिळणेबाबत |
| ३ | १६४० | श्री.विजय विठ्ठलराव देवगावकर बिल्डिंग एन, फ्लॅट नं.२, चैतन्यनगरी, वारजे, पुणे | नगर उप अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे | विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे | मौजे महर्षि कर्वेनगर, ता.हवेली येथील सर्व्हे नं.१५ चा भाग नकाशा मिळणेबाबत |
| ४ | १६५१ | श्री.रामकृष्ण चौधरी ५८७,बुधवार पेठ, पुणे | नगर भूमापन अधिकारी, शुक्रवार पेठ, पुणे -२ | अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे-१ | पुणे-एरंडवणा नगर भूमापन क्र.१२८० या मिळकतीवर लीज डीड प्रमाणे नाव दाखल करण्यासाठी दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती मिळणेबाबत |

या सर्व अपिलांमध्ये पूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्यांच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षऱ्यांमध्ये तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकामुळे त्यांच्या अधिकृततेविषयी सांशकता निर्माण होते. तसेच कार्यवाही करावी व त्यांची माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' च्या व्याख्येशी सुसंगत नाही हे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्रमांक १५६७, १६२४, १६४० व १६५१ ) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २३-०३-२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

प्रा.डॉ.सौ.आसावरी देशपांडे अपीलकर्ता
३८/२, ज्ञानेश हौ.सो.वारजे माळवाडी, पुणे-५२

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
(१)कुलसचिव, पुणे विद्यापीठ गणेशखिंड, पुणे-४११००७
(२)प्राचार्य, आदर्श शिक्षण व संशोधन महाविद्यालय कर्वे रोड,
अभिनव शाळा प्रांगण, नळ स्टॉप, शिवाजीनगर, पुणे-५
(३)शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
(१)माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे -४११००७
(२)माहिती अधिकारी, आदर्श शिक्षण व संशोधन महाविद्यालय कर्वे रोड,
अभिनव शाळा प्रांगण, नळ स्टॉप, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७+१७४ / तक्रार-पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.८.२००८ व दि.११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा
(१)माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे -४११००७ श्रीमती अरुणा वि.चव्हाण
(२)प्राचार्य, आदर्श शिक्षण व संशोधन महाविद्यालय कर्वे रोड,
अभिनव शाळा प्रांगण, नळ स्टॉप, शिवाजीनगर, पुणे-५ डॉ.सौ.ललिता राजेंद्र वर्तक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.६.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>२२ जून १९८१ ला झालेल्या मुलाखतीस विद्यापीठाची निवड समिती होती तिचा अहवाल. आदर्श बहव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाची प्राध्यापक निवड समिती जी नेमली होती त्या समितीच्या सभासदांची नांवे, निवड झालेल्या व्यक्तींची नावे व त्यावर निवड समिती सभासदांच्या सह्या असणारे कागदपत्र. सन १९९८ सालचा लोकल कमिटीचा रिपोर्ट आहे. १९८१ चा ही तसा रिपोर्ट आहे त्याची प्रत. |

## विवेचन

अपीलकर्त्या प्रा.डॉ.सौ.आसावरी देशपांडे आपल्या सेवानिवृत्तीवेतन व अनुषंगिक लाभाच्या संदर्भात मूळ सेवापुस्तक व सन १९८१ चा विद्यापीठाच्या प्राध्यापक निवड समितीचा अहवाल आदर्श शिक्षण व संशोधन महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे यांच्याकडून मिळत नसल्याची तक्रार गेल्या आठ वर्षांपासून सातत्याने करीत आहेत. या कागदपत्रांसाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे अपील व तक्रार करण्याबरोबरच लोकआयुक्त, पुणे विद्यापीठ, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) आदींकडेही डॉ.सौ.देशपांडे याबाबत सतत अर्ज व अन्य पत्रव्यवहार करीत आल्या आहेत. पुणे विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने डॉ.सौ.देशपांडे यांची सन १९८० ते सन १९९९ पर्यंत सेवा सलग धरण्याचा पुणे विद्यापीठाचा निर्णय नमूद करुन, पाचव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करुन सेवानिवृत्तीचे सर्व लाभ देण्यासाठी सलग सेवा गृहीत धरण्याची शिफारस केली. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दि.३ मे २००७ रोजी ती मान्य केली. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे डॉ.का.म.कुलकर्णी यांनी दि.१०.७.२००७ च्या पत्रान्वये सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांना तशा आशयाचा आदेश दिला. परंतु प्रत्यक्षामध्ये महाविद्यालयाकडून त्याबाबत पूर्तता होत नसल्याची डॉ.सौ.देशपांडे यांची तक्रार असून त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची मागणी त्यांनी जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ व जन माहिती अधिकारी, आदर्श शिक्षण व संशोधन महाविद्यालय, कर्वे

रोड, पुणे यांच्याकडे केली होती. मूळ सेवापुस्तक व सन १९८१ चा विद्यापीठ निवड समितीच्या अहवालाची प्रत ही कागदपत्रे डॉ.सौ.देशपांडे यांना देण्याबद्दल आदर्श महाविद्यालयाला आदेश देणारा निर्णय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे डॉ.बी.डी.देशमुख यांनी दि.२२.७.२००७ रोजी दिला. दि.११.१०.२००७ रोजी आयोगाने सुनावणी घेतली. त्यानंतर आयोगाने त्या संदर्भात महाविद्यालयाकडे विचारणा केली.

डॉ.सौ.देशपांडे यांचे प्रकरण त्यांच्या १९८०-९९ या सेवाकालाशी संबंधित आहे, म्हणजे सुमारे २७ वर्षांपूर्वीचे आहे. सदर विषयासंदर्भात महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे त्यांना दाखविण्यात आलेली आहेत. तसेच त्यांना आवश्यक वाटलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रतीही त्यांना देण्यात आलेल्या आहेत, असे आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या डॉ.सौ.ललिता राजेंद्र वर्तक यांनी दि.२५.१०.२००७ च्या निवेदनाद्वारे आयोगाला कळविले. तसेच सन १९८१ च्या प्राध्यापक निवड समितीच्या अहवालाची प्रतही दि.२९.८.२००७ रोजी डॉ.सौ.देशपांडे यांना पाठविल्याच्या पत्राची प्रत त्यांनी आयोगाला सादर केली. मात्र आपल्याला मूळ कागदपत्रे मिळाली नसल्याचे डॉ.सौ.देशपांडे यांनी दि.१७.५.२००८ पर्यंत विविध पत्रांद्वारे आयोगाला कळविले. त्यामुळे आयोगाने दि.२०.८.२००८ रोजी पुन्हा सुनावणी घेतली. विद्यापीठाने विद्यापीठाशी संबंधित अशी सर्व माहिती संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह डॉ.सौ.देशपांडे यांना दिली आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कायदा अधिकारी, पुणे विद्यापीठ श्री.बी.डी.उढाणे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती अरुणा चव्हाण यांनी दि.२०.८.२००८ रोजी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. सन १९८० व सन १९८१ च्या निवड समितीच्या अहवालाच्या प्रती डॉ.सौ.देशपांडे यांना देण्यात आल्या आहेत, असे आदर्श कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती वर्तक यांनी लेखी व तोंडी नमूद केले. 'शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या आदेशानुसार डॉ.सौ.देशपांडे यांची पेन्शन केस पूर्ण तयार करुन ती सदर अधिकाऱ्याकडून मान्य (Approved and Sanctioned) झालेली आहे. त्यानुसार सदर अधिकाऱ्याकडून डॉ.सौ.आसावरी देशपांडे

यांना अदा करण्याच्या तोषदानाबाबतसुध्दा आज्ञापत्र काढण्यात आलेले आहे. सदरच्या पेन्शन ऑर्डरचे अवलोकन केले असता डॉ.सौ.आसावरी देशपांडे यांच्या नियुक्तीची तारीख १८.९.१९८० दर्शविण्यात आलेली असून सेवानिवृत्तीची तारीख ३०.११.१९९९ अशी दर्शविण्यात आलेली आहे.' असेही प्राचार्या सौ.वर्तक यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

मात्र डॉ.सौ.देशपांडे यांनी मूळ कागदपत्रांबाबतची तक्रार कायम असल्याचे दि.१९.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. श्री.बी.डी.उढाणे यांनी डॉ.सौ.देशपांडे यांच्यासह संस्थेत जाऊन अभिलेखांचे अवलोकन करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल १५ दिवसात आयोगाला सादर करावा , असे आदेश आयोगाने दि.२३.९.२००८ रोजी दिले. त्यानुसार कार्यवाही करुन श्री.उढाणे यानी दि.२९.९.२००८ रोजी अहवाल सादर केला.

'डॉ.सौ.आसावरी देशपांडे यांचे जरी १९८१ सालचे निवड समितीच्या अहवालाच्या स्वरुपाबद्दल आक्षेप असले तरी महाविद्यालयाने सध्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या स्थितीमध्ये १९८० तसेच १९८१ सालचे निवड समितीचे अहवाल डॉ.सौ.आसावरी देशपांडे यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत,' असे श्री.उढाणे यांनी अहवालात नमूद केले.

'संपूर्ण अहवाल १९८०, व १९८१ ची ४-५ पाने अशी अहवालाची फाईल प्राचार्यांनी दाखविली. त्यात निवड समिती सदस्यांची नावे व सह्या नाहीत, असे आढळले. असा चार पानी, समिती सदस्यांची नावे व सह्याशिवाय असलेल्या पेपर्सना रिपोर्ट म्हणता येईल का?,' असा प्रश्न डॉ.सौ.देशपांडे यांनी दि.२९.९.२००८ च्या पत्रात उपस्थित केला.

'दि.१०.७.२००७ ला शिक्षण संचालकांनी - सात वर्षांनंतर पेन्शनसंबंधी पत्र दिलेले आहे. ते 'आदर्श शिक्षण व संशोधन महाविद्यालय' जेथून मी निवृत्त झाले त्या संस्थेलाही दिले. मात्र आजवर त्यासंबंधी पुढील कार्यवाही होताना दिसत नाही, शिवाय १९८१ ते १९९९ सलग सेवा धरुन पेन्शन केस तयार करण्यासंबंधी व पाचव्या वेतन आयोगानुसार सर्व फायदे देण्यासंबंधी स्पष्ट

उल्लेख असताना. कार्यवाही लांबत आहे.' असे डॉ.सौ.देशपांडे यांनी सर्व पत्रव्यवहारात नमूद केले आहे. यावरुन त्यांची कार्यवाहीची मागणी स्पष्ट होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता अपीलकर्त्या डॉ.सौ.देशपांडे यांना सेवानिवृत्ती वेतन व अन्य लाभासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे विलंबाने देण्यात आलेली दिसतात. कागदपत्रे सुमारे २७ वर्षांपूर्वीची असून सर्व अभिलेख दाखविण्यात आल्याचे प्राचार्यांचे म्हणणे आहे. विद्यापीठाच्या निवड समितीचा मूळ अहवाल महाविद्यालयाच्या दप्तरी नसणे योग्य नाही. मात्र डॉ.सौ.देशपांडे यांची मूळ मागणी सेवा सलग धरुन सेवानिवृत्ती वेतन व अन्य आर्थिक लाभ देण्याची असून त्याची पूर्तता दि.२०.६.२००८ च्या पत्रान्वये झाल्याचे दिसते. त्यानुसार कार्यवाही झाली नसलयाची त्यांची तक्रार आहे. या कार्यवाहीबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ यांनी त्यांना देणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपील निकाली ठेवण्यात येत आहे.

(२) मूळ कागदपत्रांची माहिती विहित मुदतीत देण्याची समज जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या डॉ.सौ.ललिता राजेंद्र वर्तक यांना देण्यात येत आहे.

(३) डॉ.सौ.आसावरी देशपांडे यांच्या सेवानिवृत्ती वेतन व आर्थिक लाभांबाबत दि.१०.७.२००७ च्या पत्राद्वारे शिक्षण संचालक ( उच्च शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी दिलेल्या आदेशानुसारच्या कार्यवाहीबाबतच्या सद्यस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, आदर्श शिक्षण व संशोधन महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे यांनी दि.३०.३.२००९ पर्यंत डॉ.सौ.आसावरी देशपांडे यांना द्यावी. त्याच्या प्रतीसह कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला त्यानंतर चार दिवसात सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कृष्णा रामचंद्र गायकवाड
सिध्दीविनायक आंगण, बिल्डिंग नं.बी-२,
फ्लॅट नं.३०१, ससाणेनगर, हडपसर, पुणे-२८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण,
चव्हाणनगर(पाषाण), पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक,
निरा पो.दूरक्षेत्र जेजुरी पोलीस स्टेशन, ता.पुरंधर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१२ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कृष्णा रामचंद्र गायकवाड
सिध्दीविनायक आंगण, बिल्डिंग नं.बी-२,
फ्लॅट नं.३०१, ससाणेनगर, हडपसर, पुणे-२८

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण,
चव्हाणनगर(पाषाण), पुणे प्रतिनिधी श्री.रविंद्रसिंह परदेशी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक,
निरा पो.दुरक्षेत्र जेजुरी पोलीस स्टेशन, ता.पुरंधर, जि.पुणे
प्रतिनिधी श्री.बी.ए.कोंडूभैरी (सहा.जन माहिती अधिकारी)

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.२०.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी दिलेल्या जबाबाची छायांकित प्रत. गट नं.५०८ मधील आंब्याची रोपे नाश केली त्याच्या पंचनाम्याची छायांकित प्रत. चॅप्टर क्रस नं.१५९/०७ कोणावर दाखल केली, कोणत्या कार्यालयात व कधी, त्याची तारीख, नंबर व दाखल केलेल्या केसच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती. | |

## विवेचन

जेजुरी पोलीस ठाण्याने पिकाच्या नुकसानीच्या संदर्भात दाखल केलेल्या चॅप्टर केसबाबतची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.कृष्णा रामचंद्र गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अभिलेखात उपस्थित असलेली सर्व माहिती देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, निरा पो.दुरक्षेत्र, जेजुरी पोलीस स्टेशन यांचे प्रतिनिधी सहा.जन माहिती अधिकारी श्री.बी.ए.कोंडूभैरी व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक श्री.अशोक मोराळे यांनी आयोगाने आयोजित केलेल्या दि.२६.११.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. मात्र आपल्याला मिळालेली माहिती खोटी असल्याचे श्री.गायकवाड यांनी नमूद केले. उभय बाजूंचे एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

आपल्या जमिनीतील आंब्याच्या रोपांची नासधूस केल्याच्या प्रकाराबाबत आपण दिलेली साक्ष, पंचनाम्याची प्रत आपल्याला दिली जात नाही, असे श्री.गायकवाड यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. सदरची बाब दिवाणी स्वरुपाची असल्यामुळे व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल नसल्याने पंचनामा करण्यात आलेला नाही. श्री.गायकवाड यांनी दिलेल्या जबाबाची प्रत चॅप्टर केससोबत तहसीलदार, पुरंधर यांच्याकडे दि.२३.७.२००७ रोजी दाखल केली आहे, अशी माहिती

श्री.गायकवाड यांना देण्यात आली आहे. चॅप्टर केसची छायांकित प्रतही त्यांना दिली आहे, असे सहा.जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, जेजुरी पोलीस स्टेशन श्री.कोंडूभैरी यांनी सांगितले. संबंधित चॅप्टर केस आपल्याला प्राप्त झाली नसल्याचे तहसीलदार, पुरंधर यांनी आपल्याला कळविले आहे असे श्री.गायकवाड यांनी तहसीलदार, पुरंधर यांच्या पत्रासह नमूद केले. परंतु दि.१२.९.२००८ ची तहसीलदार, पुरंधर यांच्या लिपिकाची पोहोच श्री.कोंडूभैरी यांनी सादर केली. श्री.गायकवाड यांचा दि.१२.१०.२००७ चा अर्ज, दि.४.१२.२००७ रोजी प्राप्त झाला व दि.१८.१२.२००७ रोजी त्यांना माहिती देण्यात आली, असेही श्री.कोंडूभैरी यांनी नमूद केले. चॅप्टर केसचा विषय नसताना चॅप्टर केस केली, असा आक्षेप श्री.गायकवाड यांनी नोंदविला. परंतु तो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. तहसीलदार, पुरंधर यांच्या कार्यालयाची पोहोच असूनही संबंधित चॅप्टर केस आपल्याला प्राप्त न झाल्याचे पत्र त्यांनी दिले आहे, ही गंभीर बाब आहे. तहसीलदार, पुरंधर यांनी त्याबाबतचा खुलासा करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) चॅप्टर केस प्राप्त न झाल्याच्या संदर्भात तहसीलदार, पुरंधर यांनी संबंधित तारखेच्या जावक नोंद पुस्तिकच्या प्रतीसह १० दिवसात खुलासा आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.३.२००९**